# सायबर पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड

**पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड,**
**प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे**
**दुरध्वनी क्रंमाक ०२०-२७३५०१२०**

प्रेसनोट/पिंपरी चिंचवड दिनांक - /११/२०२४

**शेअर मार्केट ट्रेडिंगमध्ये गुंतवणुकीचे बहाण्याने जेष्ठ नागरिकाची ऑनलाईन ९९,००,०००/- रुपयांची फसवणुक करणारे आंतरराष्ट्रीय टोळीशी संपर्कात असलेला व दुबई येथिल बँकेत काम करणारे कर्मचाऱ्यासह एकुण ०८ आरोपींना सायबर पोलीसांकडुन अटक करुन गुन्हा उघड.**

रहाटणी काळेवाडी येथे राहणारे जेष्ठ नागरीकास ऑनलाईन ट्रेडींग करण्यासंदर्भात अनोळखी इसमाने लिंक पाठवुन व्हॉटसअपग्रुपमध्ये अॅड केले. त्यानंतर CAUSEWAY नावाचे अॅप डाउनलोड करण्यास सांगुन त्यामध्ये गुंतवणुकीचे रोज दोन टास्क देऊन ते टास्क पुर्ण केल्यास ३०० टक्के पर्यन्त नफा देण्याचे अमीष दाखवुन विश्वास संपादन करुन त्यांची ९९,००,०००/- रुपयांची फसवणुक केल्याने सायबर पोलीस ठाणे गुरनं. ०२/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१६(२), ३३५(अ) (१), ३३६(३), ३३९, ३(५) सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम (सुधारीत) कायदा २००८ चे कलम ६६ (डी) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयामध्ये आर्थिक फसवणुक ही मोठया स्वरुपाची असल्याने व अशा प्रकारचे गंभीर स्वरुपांचे गुन्हयांना प्रतिंबध होणेकामी सदर गुन्हयाचा सखोल तपास करुन गुन्हा उघडकीस आणुन आरोपी अटक करणेकामी मा. पोलीस आयुक्त, श्री. विनयकुमार चौबे यांनी आदेशित केले होते. त्याप्रमाणे मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री. संदीप डोईफोडे, मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे श्री. डॉ. विशाल हिरे यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे हे गुन्हयाचा तपास करीत आहेत. सदर गुन्हा उघडकीस आणणेकरीता व तपासकामी सपोनि. प्रविण स्वामी व पोउपनि. सागर पोमण,पोउपनि वैभव पाटील,पोउपनि प्रकाश कातकाडे यांची पथके तयार करुन गुन्हयाचे तपासाबाबत मार्गदर्शन केले.

त्याप्रमाणे तपास करीत असताना आरोपी यांनी गुन्हयासाठी वापरलेल्या बँक अकाऊंटपैकी एक बँक अकाऊंट हे मुंबई येथील असल्याबाबत माहिती मिळाल्याने सदरठिकाणी सपोनि. स्वामी, पोउनि. पोमण, पोउपनि वैभव पाटील यांची पथके तयार करुन त्यांनी तपास केला असता अकाऊंटधारकाने सदरचे बँक अंकाउट हे त्याचा मामा नामे महादेव कटके यांचे सांगण्यावरुन काढुन सदर अंकाउट हे संपुर्ण किटसह त्याचेकडे दिले असल्याचे सांगितले. त्याबाबत अधिक तपास करुन तसेच तांत्रिक विश्लेषणाद्वारे तपास करता सदरचा गुन्हा हे महादेव कटके याचा शोध घेवुन त्याचेकडे तपास करता त्याने सदर अकाऊंटसह इतर बँक अकाऊंट हे आरोपी नामे मसुद आलम व सागर भोसले यास दिले असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे अधिक तपास व तांत्रिक विश्लेषणाद्वारे तपास करुन मुंबई येथुन संशयीत आरोपी **१) महादेव ऊर्फ मधुकर गंगाधर कटके** वय ४४ वर्षे रा. कामोठे, नवी मुंबई, **२) मसुद आलम सिद्दीकी** वय- ४८ वर्षे रा. लोढा बी विंग जोगेश्वरी पश्चिम मुंबई, **३) मोहम्मद अफझल सलमानी** वय ४९ वर्षे रा. गोरेगाव वेस्ट,मुंबई, **४) तौसिफ जैनुद्दिन सैय्यद** वय- ४० वर्षे रा. इरानी कॉलनी, मालाड पुर्व, मुंबई यांना अटक करुन त्यांचे पुढील साथीदार **५) सागर ब्रम्हदेव भोसले,** वय ३८ वर्षे रा. लासुर्णे, ता. इंदापुर, जि. पुणे, **६) इम्रान मोहम्मद हसन सय्यद** वय ४४ वर्षे रा. कळवा, ठाणे, **७) प्रणव प्रविण दळवी** वय ३० वर्षे रा. बोरीवली ईस्ट, मुंबई.**८) दानिश दिलावर साठी** वय २४ वर्षे रा. देवीपाडा रोड, मुंब्रा, ठाणे यांना मुंबई येथे जावुन सापळे रचुन अटक करण्यात आली आहे.

प्राथमिक तपासामध्ये आरोपी **दानिश दिलावर साठी हा दुबई येथील अबुधाबी बँकेमध्ये** तीन वर्षापासुन स्थायी कर्मचारी असुन दुबई येथील त्याचे साथीदाराचे सांगण्यावरुन तो भारतात येवुन नमुद साथीदारांचे मदतीने सदरचे गुन्हे करीत असल्याचे दिसुन आले आहे. तसेच आरोपी **प्रणव दळवी हा टेलिग्रामच्या माध्यमातुन हॉंगकॉंग** येथील इसमास बँक अकाऊंट विक्री करीत असल्याची माहीती मिळुन आली आहे.

तपासामध्ये आरोपी यांचेकडुन एकुण १३ मोबाईल, वेगवेगळे बँक अकाऊट, किट इत्यादी असा **१,२०,०००/- रु.** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन ७ लाख रुपये वेगवेगळया बँक अकाऊंटवर होल्ड करण्यात आले आहेत. वर नमुद आरोपींना अटक करण्यात आली असुन त्यांची दि. १६/११/२०२४ पर्यंत पोलीस कोठडी मंजुर आहे. आरोपी यांचे दुबई, हाँगकाँग येथिल आंतरराष्ट्रीय टोळीबरोबर संबध असल्याचे प्राथमिक तपासामध्ये दिसुन आले आहेत, आरोपी यांचेकडे एकुण ३६ बँक अकाऊंटची माहीती मिळुन आली असुन त्यावर संपुर्ण भारतात एकुण २७ पोर्टलच्या तक्रारी दाखल असल्याची माहीती प्राप्त झाली आहे. तसेच आरोपी याने गुन्हयासाठी वापरलेले बँक अकाऊंटवर २.६८ कोटी रुपयांचे व्यवहार मिळुन आहेत त्याअनुषंगाने सखोल तपास चालु आहे. दाखल गुन्हयाचा अधिक तपास पोलीस निरीक्षक श्री. रविकिरण नाळे हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा. विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. डॉ. शशिकांत महावरकर - सह पोलीस आयुक्त, मा. वसंत परदेशी - अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. संदिप डोईफोडे - पोलीस उपआयुक्त, गुन्हे, मा. डॉ. विशाल हिरे - सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे १ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे, सपोनि. प्रविण स्वामी, पोउपनि. सागर पोमण, पोउनि. वैभव पाटील, पोउनि. प्रकाश कातकाडे , पोलीस अंमलदार हेमंत खरात, दिपक भोसले, दिपक माने, अतुल लोखंडे, प्रितम भालेराव, श्रीकांत कबुले, अभिजीत उकिरडे, सौरभ घाटे, संदिप टेकाळे, निलेश देशमुख, सुरंजन चव्हाण, दिपाली चव्हाण सर्व नेमणुक सायबर पोलीस ठाणे यांच्या पथकाने केली आहे.

**नागरीकांना आवाहन - शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक करणेसाठी सेबी पुरस्कत ॲप्लीकेशनचा वापर करावा. शेअर मार्केट गुंतवणुक करण्यासाठी सेबी पुरस्कत ॲप्लीकेशन हे वेगवेगळया खात्यांमध्ये पैसे भरण्यास सांगत नाहीत. शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक करताना आपण बनावट प्लॅटफार्मवर गुंतवणुक करत नाहीत ना याची खात्री करावी. कोणत्याही परिस्थितीत आपला मोबाईल स्क्रिन, बँक अकाऊंट, वैयक्तीक माहीती शेअर करु नये.**

**(संदिप डोईफोडे)**
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे,
पिंपरी चिंचवड.